**प्रस्तावना :- घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी होणाऱ्या अतिरिक्त खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत व सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांना मुदतवाढ देणे बाबत.**

**मे. सविनय सादर,**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मनपाकडील ५० घंटागाडी व २३ आर सी कॉम्पॅक्टर वाहने, सदर वाहनांवर भाडेतत्वावर वाहन चालक, मजुर व इंधन पुरवठा मनपा मार्फत व याव्यतिरिक्त आवश्यक वाहने भाडेतत्वार घेवून मनपा कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाचे काम करणेसाठी रु.२,०२,१६,४६८/- च्या खर्चास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.२२/०२/२०२४ रोजी मान्यता दिली आहे.

मागील कार्यरत मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई या ठेकेदार संस्थेस घनकचरा व्यवस्थापन करारनांमा अटी शर्ती नुसार पुरविण्यात आलेली ५० घंटागाडी व २३ आर सी कॉम्पॅक्टर वाहने ठेकेदार संस्थेने मनपास हस्तांतरीत न केल्यास त्या वाहनांच्या जागी पर्यायी वाहने भाडेतत्वावर घेणेसाठी होणारा अतिरिक्त खर्च मनपाने मंजुर केलेल्या दरानुसार अदा करणेबाबत पृष्ठ क्र. एन-६४ वर नमुद असुन त्यास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने ठेकेदार संस्थेने मनपा मालकिची वाहने अद्याप पर्यंत मनपास हस्तांतरीत न केल्यामुळे सदर वाहनांच्या जागी पर्यायी वाहने भाडेतत्वावर घेण्यात आली असल्याने माहे एप्रिल २०२४ ते माहे जुन २०२४ या कालावधीत कार्यरत ठेकेदार यांचे कचरा संकलन व वहन करणेसाठी पुरवठा केलेल्या वाहनांचे व मजुरांचे देयक अदा करणेकामी मंजुर खर्च रु.२,०२,१६,४६८/- पेक्षा जास्त अनुक्रमे माहे एप्रिल २०२४ मध्ये रु.३६,५२,४९४/-, माहे मे २०२४ मध्ये रु.४२,९४,३०२/- व माहे जुन २०२४ मध्ये रु.३६,७१,१५८/- असा एकुण रु.१,१६,१७,९५४/- अतिरिक्त खर्च झाला असुन त्या अतिरिक्त झालेल्या खर्चास व माहे जूलै व ऑगस्ट २०२४ चे देयक अदा करणेकामी होणारा प्रतिमाह अंदाजे रु.४० ते ४३ लक्ष जास्त खर्च येत असुन एकुण मासिक अंदाजे रु.२.४५ कोटी खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळावी.

तसेच कचरा संकलन व वहन करणेकामी कार्यरत ठेकेदार यांचे दि.१४/०८/२०२४ रोजी कार्यादेशाचा कालावधी संपुष्टात येत असल्याने मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.०७/०८/२०२४ रोजी कचरा संकलन व वहन करणेकामी सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांना दि.३१/०८/२०२४ रोजी पर्यंत मुदवाढ देणेकामी दिलेल्या मंजुरीनुसार सदर कार्यरत ठेकेदार यांना दि.३१/०८/२०२४ पर्यंत कार्यादेश देणेकामी व वर नमुद प्रमाणे मासिक होणाऱ्या अतिरिक्त खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचा प्रशासकिय ठराव घेणेस विनंती आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ४८४ **दि.** १४/०८ **/२०२४**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी प्रतिमाह अंदाजे रु.४० लक्ष इतक्या अतिरिक्त खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची कार्योत्तर मान्यता मिळणे कामी व सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांचा कार्यादेशाचा कालावधी दि.१४/०८/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने दि.०७/०८/२०२४ रोजीच्या मंजुरीनुसार सदर ठेकेदार यांना दि.३१/०८/२०२४ पर्यंत मुदतवाढ देणेकामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसारं मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी माहे एप्रिल २०२४ मध्ये रु.३६,५२,४९४/-, माहे मे २०२४ मध्ये रु.४२,९४,३०२/- व माहे जुन २०२४ मध्ये रु.३६,७१,१५८/- असा एकुण रु.१,१६,१७,९५४/- अतिरिक्त खर्च झाला असुन त्या अतिरिक्त झालेल्या खर्चास व माहे जूलै व ऑगस्ट २०२४ चे

देयक अदा करणेकामी होणारा प्रतिमाह अंदाजे रु.४० ते ४३ लक्ष जास्त खर्च येत असुन एकुण मासिक अंदाजे रु.२.४५ कोटी खर्चास कार्योत्तर मंजुरी व कचरा संकलन व वहन करणेकामी सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांना दि.१५/०८/२०२४ ते दि.३१/०८/२०२४ रोजी पर्यंत मुदवाढ देणेकामी दिलेल्या मंजुरीनुसार सदर कार्यरत ठेकेदार यांना दि.३१/०८/२०२४ पर्यंत कार्यादेश देणेकामी तसेच आवश्यकते नुसार बदल करणे कामी अधिकार राखुन ठेवुन यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेत येत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

O/C
HC

84-PC- MY DOC - 2024 (NEW SOLID WASTE TENDER - 2024)